ई-विविधा

अंक :०४ सप्टेंबर २०२६

कार्यकारी संपादक
मंदार कुळकर्णी

मुद्रितशोधन
तेजाली शहासने

संपादक मंडळ
वैभवी देशमुख
नितांत पेडणेकर
माधवी मराठे

मार्गदर्शक मंडळ
संहिता हिस्वनकर
आनंद माने
शशिकांत रणवरे

मांडणी व सजावट
वैभवी देशमुख
मंदार कुळकर्णी

प्रकाशन व वितरण
सुनील सामंत
ई-साहित्य प्रतिष्ठान

चित्रे
सर्व चित्रे : साभार आंतरजाल व AI

सूचना:
ह्या अंकातील लेखनाचे सर्व हक्क त्या त्या लेखकांचे आहेत. Copyright व त्यासंबंधी कायदेशीर प्रक्रियांची जबाबदारी संबंधित लेखकांची आहे. त्याला ई-विविधा तसेच ई-साहित्य प्रतिष्ठान जबाबदार असणार नाही. साहित्यात लेखकांनी व्यक्त केलेली मते पूर्णतः त्यांची असून त्यांच्याशी संपादक मंडळ सहमत असेल असे नाही. या अंकातील लेखनाचे आणि फोटोंचे सर्व हक्क त्या त्या लेखकाकडे सुरक्षित असून पूर्ण लेखनाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई(दंड व तुरूंगवास) होऊ शकते. हा अंक वेबसाइटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त इतर कुठल्याही कामासाठी वापरण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

संपादकीय

नमस्कार मंडळी,

प्रयत्नातील सातत्य हे कुठलीही गोष्ट टिकून राहण्याचे महत्त्वाचे साधन आहे. सुरूवात अनेक लोक करतात मात्र जे सतत धडपड करून समोर येतात त्यांची दखल येणारा काळ घेतो. आमचेही थोडेफार तसेच आहे, स्वयंप्रेरणेने ह्या नियतकालिकाचे काम करताना येणाऱ्या अडचणी पार करून आम्ही आपल्यापर्यंत ई–विविधाचा चौथा अंक आणत आहोत. ह्यात आम्हाला साथ आहे ती ई–साहित्य प्रतिष्ठानाची, आमच्या लेखकांची आणि तुम्हा वाचकांची. त्यासाठी सगळ्यांचे आभार.

वाचनाचे महत्त्व कुणाला नव्याने सांगायची गरज नसली तरी नव्या पिढीसमोर पुन्हा अधोरेखित करण्याची गरज वाढते आहे. नवी पिढी वाचत नाही हे खोडून काढायला बरेच पुरावे आहेत. मात्र हेही तितकेच खरे की ते वाचन तुटक, तुकड्यांमध्ये आणि छोट्या शब्द संख्येत विभागलेले आहे. त्याचे फायदे असतीलही मात्र त्यामुळे दीर्घ व एकसंध वाचनाने होणारा बुद्धी व मेंदूचा विकास तितका होत नाही हेच खरे. माणूस पुस्तके, नियतकालिके, इत्यादी एकाच वा अनेक विषयांना वाहिलेले दीर्घ साहित्य वाचतो तेव्हा मेंदूची जडणघडण बदलत असते, परिपक्व होत असते. तेव्हा माणूस वाचत असलेल्या गोष्टींवर सवडीने विचार करतो आणि आपले ज्ञान वाढवतो. म्हणून आजच्या पिढीला पावसाळ्यात पेरते व्हा सांगणाऱ्या पावशाप्रमाणे "वाचते व्हा" सांगणारा हा अंक.

ह्या अंकात काय वाचायला मिळेल? तर एका वाक्यात उत्तर म्हणजे: जगताना माणूस जमवत असलेल्या आठवणींचा, जगत असलेल्या वर्तमानाचा आणि त्यातून फुलणाऱ्या भावना व आकांक्षांचा भावबंध ह्या अंकातील साहित्यात दिसून येईल. तेव्हा वाट कसली बघताय? वाचते व्हा.

आपला विश्वासू,
मंदार कुळकर्णी
(कार्यकारी संपादक, ई–विविधा)
तसेच संपूर्ण संपादक मंडळ व ई– साहित्य प्रतिष्ठान

[ता. क.: आम्हाला वाचकांकडून खूप सुंदर प्रतिक्रिया येत आहे, त्यातील काही सोबत जोडतो आहे; नक्की वाचा आणि भरभरून कळवा!]

प्रतिक्रिया

सस्नेह नमस्कार,

'ई–साहित्य प्रतिष्ठान' आणि कार्यकारी संपादक मंदार कुळकर्णी यांच्यासह संपूर्ण संपादक मंडळाचे मनःपूर्वक अभिनंदन! 'ई–विविधा'चा हा जून २०२६ चा तिसरा अंक म्हणजे साहित्याची आणि पावसाची सांगड घालणारा एक सुंदर आणि आल्हाददायक नजराणा ठरला आहे.

संपादकीयमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे, कवी कालिदासांच्या 'मेघदूता'पासून ते आधुनिक काळातील 'गारवा' गाण्यांपर्यंतचा पावसाचा प्रवास आठवून या अंकाने रसिकांच्या मनाला एक वेगळीच अनुभूती दिली आहे. पावसाचे वेध लागलेले असताना, या अंकासाठी 'पाऊस' हा मध्यवर्ती विषय निवडणे अत्यंत समर्पक आणि अचूक ठरले आहे.

'माझं कवितांचं गाव, जकातवाडी'च्या वतीने भावलेली काही खास वैशिष्ट्ये:

१. पावसाची विविधांगी रूपे: अंकात जसा मुंबईची तुंबई करणारा पाऊस आहे, तसाच काळ्या आईच्या कुशीत सृजनाचे स्वप्न फुलवणारा आणि सामान्य माणसाच्या मनात हळवी आठवण जागी करणाराही पाऊस आहे. या नानाविध छटांमुळे अंकातील प्रत्येक पान वाचकाला खिळवून ठेवते.

२. साहित्यिक समृद्धी: शुभांगी पुरस्तके यांची 'जुई आणि लिली', वैभवी देशमुख यांचे 'इंद्रधनुष्य' आणि उज्ज्वला बन्सोले यांचे 'थेंब पावसाचे' यांसारख्या विविध साहित्यकृतींमधून पावसाचा गंध आणि माणसाच्या मनाचे रंग उत्तम प्रकारे कागदावर उतरले आहेत.

३. सजावट आणि मांडणी: अंकाची मांडणी, अक्षरांची जुळणी आणि आंतरजालाच्या माध्यमातून केलेली चित्रांची निवड अत्यंत देखणी आहे, ज्यामुळे वाचनाचा आनंद अधिकच वाढतो.

संपादकीयामधील तो प्रश्न मनाला स्पर्शून गेला— "इतंक सगळं दिसलं आम्हाला एका पावसाने. हे सगळं तुम्हालाही दिसते का?" यावर आमच्या कवितांच्या गावचे उत्तर 'हो' असेच आहे! तुमच्या या अंकाने आमच्याही मनातील काव्यभावनांना नवे अंकुर दिले आहेत.

स्वायत्त नियतकालिक म्हणून यशस्वीपणे टाकलेले हे तुमचे तिसरे पाऊल नक्कीच मराठी ई–साहित्य विश्वात मैलाचा दगड ठरेल. 'ई–विविधा'च्या पुढील सर्व अंकांना आणि संपूर्ण टीमला आमच्या 'माझं कवितांचं गाव' परिवारातर्फे मनापासून अनंत शुभेच्छा! अशाच अक्षरांच्या कोसळणाऱ्या धारांमध्ये आम्हा वाचकांना नेहमी चिंब भिजवत राहा.

विनीत,

प्रल्हाद पारटे

अध्यक्ष/संस्थापक: माझं कवितांचं गाव, जकातवाडी (राजधानी सातारा)



अनुक्रमणिका

शाळेचा पहिला दिवस	०१	श्रद्धा हळदणकर
हिंदोळा	०५	सौ. भारती सावंत
पेरणी	०९	संतोष पवार
प्रार्थना नाकारली जेव्हा घनांनी	११	कविता क्षीरसागर
प्रेयसी	१३	रोहित कुळकर्णी
छंद असावा	१५	कॅरल डिकोस्टा
मन्या इंजिनीअर(विडंबन)	१८	विनय भालेराव
चिऊताई! चिऊताई! दार उघड	२०	शिल्पा गुप्ते–जोशी
स्वप्नातली शाळा	२६	कैलास बडगुजर
ध्येयवेडी माणसे	३१	ज्योती पतिंगराव
शेतकऱ्याचं जगणं	३५	सनहा पठाण
नवजीवन	३८	गोरक्षनाथ देवकर
पारिजातकाचं आयुष्य	४१	निळकंठ मैलापुरे
माझी आठवण येईल का?	४५	सौ. मनिषा पाटील
उणीव	४७	शिवाजी मगर
खरं जीवन मृत्यूनंतर आहे का?	५०	प्रथमेश प्रभुतेंडोलकर
ती	५३	मनोहर सुरवाडे

शाळेचा पहिला दिवस

उन्हाळी सुट्टीचा मनसोक्त आनंद लुटल्यानंतर अचानक येऊन आमच्यासमोर आदळायचा तो 'शाळेचा पहिला दिवस'. संपूर्ण मे महिनाभर दंगामस्ती करताना या शाळेतला 'श' ही आमच्या गावी नसायचा. पण पावसाच्या पहिल्या सरी अंगणात बरसू लागल्या की शाळेच्या पहिल्या दिवसाची उत्सुकता जाणवू लागायची.

सगळ्यात पहिलं काम असायचं, आजोळहून आपल्या गावी परतणे. आजी–आजोबांच्या प्रेमळ सहवासातून आता एका शिस्तबद्ध वेळापत्रकात शिरायला मन तयार नसायचं, पण गणपतीच्या सुट्टीत परत येण्याविषयी सांगून आजी समजूत काढायची. तिला 'पुढच्या वेळी आल्यावर काय काय करायचं' याची भलीमोठी लिस्ट सांगून आणि त्यांच्या पूर्ततेचं आश्वासन घेऊन मगच मी माझ्या गावी परतत असे.

शाळेची नवीन सुरूवात म्हणजे नवी खरेदी आलीच! शाळा उघडण्याचा दिवस अगदी उद्यावर येऊन ठेपला तरी ती चाललेलीच असायची. नवा गणवेष, वह्या, पुस्तके, पेन, कंपास बॉक्स, दप्तर, पाण्याची बाटली, डबा, चप्पल आणि पावसाळ्यातचे विशेष आकर्षण असलेली रंगीबेरंगी छोटीशी छत्री अशा सर्व चिजा अगदी दहा–बारा दुकानं पालथी घालून आणि हट्ट करून मनासारख्या मिळवलेल्या असायच्या. या सगळ्या वस्तू कधी एकदा आपल्या मित्रमैत्रिणींना दाखवतेय, असं होऊन जायचं. हे सर्व पाहिल्यावर त्यांची प्रतिक्रिया काय असेल, कसे आश्चर्यचकित होतील, ते काय म्हणतील, याचा विचार करण्यात अख्खी रात्र सरायची. आणि बहुप्रतिक्षित असलेला, तो शाळेचा

पहिला दिवस एकदाचा उगवायचा. उठल्यापासून ते तयार होऊन बाहेर पडेपर्यंत काय घाई व्हायची! आईही गालातल्या गालात हसत सगळी तयारी करून द्यायची. कदाचित तिलाही तिच्या शाळेचा पहिला दिवस आठवत असावा त्यावेळी! मग नवीन घेतलेली सगळी आयुधं परिधान करून अगदी युद्धावर निघाल्याच्या थाटात आम्ही शाळेला जायला निघायचो. रस्त्याने जाताना पाऊस पडत नसला तरीही छत्री उघडून घेतलेली असायची बरं! आता अख्खी बाजारपेठ धुंडाळून घेतलेली ही खास छत्री लोकांना दाखवायला नको का?

शाळेच्या फाटकाजवळ पोहोचलो आणि मैत्रिणी दिसल्या की आईचा धरलेला हात आपोआप सुटायचा, तिच्या सूचना कानाबाहेरच राहायच्या आणि मी आत पोहोचायचे. जवळपास महिन्या–दीड महिन्याने दिसत असलेले आपल्या सुहृदांचे हसरे, निरागस चेहरे पाहून क्षणभर सगळं विसरून जायला व्हायचं आणि दुसऱ्याच क्षणी सुरू व्हायची ती अखंड बडबड. प्रत्येकाला त्याने सुट्टीत काय काय केलं, ते आधी सांगायचं असायचं. पण कुणी कुणाचं पूर्ण बोलणं ऐकेल तर शप्पथ! समोरच्याचं बोलणं मध्येच तोडत मी त्यापेक्षा जास्त मजा कशी केली हे सांगण्याची अशी काही चढाओढ रंगायची की कितीतरी वेळ घणघणणाऱ्या शाळेच्या घंटेलाही, आम्हाला भानावर आणणं शक्य नसायचं. काही वेळाने आपल्या बडबडीचा ओघ तोडू न देता आम्ही आपला नवा वर्ग शोधायच्या मोहिमेवर निघायचो. शिक्षकही आमचा हा अथांग चिवचिवाट कौतुकाने बघत उभे असायचे. महिन्याभराच्या अंतराने आपल्या विद्यार्थ्यांना

भेटल्याचा आनंद त्यांच्याही चेहऱ्यावर पाझरत असायचा. घंटा वाजली की आम्ही आपापला वर्ग शोधायची घाई करायचो आणि या आनंदाला सोबत घेऊनच आम्ही त्या दिवसाची आणि शाळेच्या नव्या वर्षाची सुरुवात करायचो.

- श्रद्धा हळदणकर

मुंबई, महाराष्ट्र

हिंदोळा

म्हणती कुणी आपले काही
सखी चल झुलवूया हिंदोळा
स्वप्नांच्या दुनियेत फिरवतो
रेशमी बंधाचा हा झोपाळा

सखी, आठवतो का तुला तो बालपणीचा झोपाळा? साऱ्याजणी खूप खेळीमेळीने खेळायचो; मस्ती, धांगडधिंगा यातच दिवस सरत असे. हिंदोळे घेतानाच पदलालित्यही दाखवायचो. सखी, किती सुंदर ते जीवन! अमृततुल्य फळांचे मनसोक्त सेवन करताना जुळायचे मैत्रीचे रेशीम बंध...घरातून आलेली सादही कानावर पोहोचत नसे...एवढे मश्गुल असायचो क्रीडांगणावर.

समरसून खेळणे, जिवापाड प्रेम करणे नि जिवाला जीव देणे या वाक्प्रचारांचे अर्थ व संदर्भ त्याच वयात लागू लागले. झुळझुळ वाहणाऱ्या झऱ्यासारखे मैत्रीचे नाते उलगडत गेले. 'किती मरावं मैत्रीत' हेही संशोधन त्याच वयात झाले. मैत्रीची ही ढाल हरप्रसंगी उपयोगी पडायची. घडीभराचे भांडणही मनात घोंगावणारे वादळ घेऊन यायचे. भांडणातला तो राग, रूसवा लटका ठरायचा आणि एकमेकींच्या गळ्यात गळे टाकून कधी रस्त्याने चालू पडायचो, हेही कळायचे नाही. किती सुंदर त्या मैत्रीच्या कल्पना आणि मैत्रीतले ते वेडे प्रेम! असे वाटायचे कालची ही मैत्री नसून जन्मोजन्मीच्याच प्रेमपूर्वक मारलेल्या

गाठी आहेत. एकमेकींसमवेत अभ्यास, खेळ, भांडण, रूसवा, कानगोष्टी, हितगुज आणखी काय काय... !

घरात फक्त जेवायला आणि झोपायलाच असायचो. बाकी सर्व वेळ गळ्यात गळे घालून एकमेकींच्या सहवासातच असायचो. सुट्टी आली की मात्र जास्त बेचैन व्हायचं. कारण शाळेत जावे लागायचं नाही. कधी तू मामाच्या गावी जायची, कधी मी मामाच्या गावी जायची. पण तिथेही आपण आपल्या आठवणींच्या हिंदोळ्यांवर झुलतच असायचो.

आतासारखे त्याकाळी मोबाईलही नव्हते. त्यामुळे एकमेकींना पत्र लिहून आपल्या मनातील व्यथा आणि हितगुज व्यक्त करत असायचो.पण आता तर आपले विवाहसुद्धा झालेत. दोघींनीही आपापल्या नवजीवनात प्रवेश केला आहे. सासरचा उंबरठा पार करून आपण वेगळ्या घरात पाऊल टाकलेले आहे. त्यामुळे आपणावर आणि आपल्या मैत्रीवर थोडी बंधने आली आहेत. आपल्यातील अंतर आता थोडे दुरावलेही आहे. तरीही बालपणीच्या त्या सुखद आठवणींमध्ये आपण नेहमीच मश्गुल असतो.

"तुझ्या माझ्या मैत्रीचे
आवळलेत घट्ट धागे
जपू या हे बंध रेशमी
होऊ प्रेमानेच जागे"

मैत्री या नात्यातच समर्पण आहे. आठवते का गं सखी तुला? सायकलवरूनची आपली भ्रमंती? टवाळ पोरांची मस्करी, तुझं चिडणं, त्या मुलांना उपदेश? सारं आठवतंय मला! आठवांचा हिंदोळाच जणू आज हेलकावतोय. तुझ्या रम्य आठवणींत रमून मी स्वतःलाच विसरलेय. बाल्यावस्थेत पोहोचलेय बघ! तुलाही माझा दुरावा जाणवत असेलच ना गं सखी?

- सौ. भारती सावंत

(खारघर, नवी मुंबई)

पेरणी

कशी करावी पेरणी
मृगास फुटेना पाझर
धरणी ही भेगाळली
कसा फुटेल अंकुर

नभातील मेघ एक
रोज दाखवी वाकुल्या
बळीराजा पाही त्यास
नजरेने आसुसल्या

आधी आला अवकाळी
आता रुसून बसला
लहरी स्वभावाने तुझ्या
जीव लागे टांगणीला

विहिरी कोरड्या कोरड्या
झऱ्यातील आटे पाणी
मातीतील बियाणास
नजर लावली हो कुणी

' पेरते ' कसे व्हावे आता
तुझा काय भरवसा
शिवारातले काळे वाफे
हिरवे कसे होतील आता

- संतोष रामचंद्र पवार

(सावंतवाडी, महाराष्ट्र))

प्रार्थना नाकारली जेव्हा घनांनी

प्रार्थना नाकारली जेव्हा घनांनी
भिजवले मग शेत त्यांनी ... आसवांनी

का असे झाकोळले आहे अचानक
छेडला मल्हार बहुधा आठवांनी

कोरडे नक्षत्र गेले ... चिंब डोळे
गर्जना नुसतीच केली ह्या ढगांनी

पावसाळी रात्र, होती एक छत्री
जवळ आलो.. अर्धओलेत्या क्षणांनी

ही तुझ्या त्या पावसाची छेडखानी
पकडली चोरी पुन्हा ओल्या खुणांनी

वीज पडल्यासारखे झाले मनावर
तोडला जेव्हा भरोसा प्रियजनांनी

श्रावणाचा भासही देई तजेला
सोसले चटके उन्हाचे त्या घरांनी

• कविता क्षीरसागर
पुणे , महाराष्ट्र

प्रेयसी

रोज तिन्हीसांजेला हळूच कोणीतरी
झाडांच्या सावल्या चोरून नेतं.
झाडाला फांद्यांआडून दिसतच नाही
अंधारात कोणीसं समोरून येतं.

पानं रात्रभर सळसळत कुजबुजतात
उद्या उन्हात अंथरायचं काय?
जमीन खोडाला विचारते काळजीने
भरदुपारी मी पांघरायचं काय?

फुलांनी विचारलं कळ्यांनाही हळुवार
पाकळ्यांनी कुठे पाहिले का तिला?
चंचल वाऱ्यावर गंधाळून दरवळताना
त्यांनी चांदण्यात वाहिले का तिला?

हळव्या वेली मात्र जाणतात गुपित
सावली उन्हाची प्रेयसी आहे.
विरहसंध्येला झाली अदृश्य तरीही
संगतीत त्याच्या श्रेयसी आहे.

- रोहित कुळकर्णी
(पुणे, महाराष्ट्र))



छंद असावा

छंद असावा एकतरी,
मग तो लिहिण्याचा वा वाचण्याचा.

स्वतःला व्यक्त करण्यासाठी,
प्रेम, राग, भीती — सगळंच
ज्या वेळी बोलून व्यक्त होता येत नाही,
तेव्हा लिहून व्यक्त व्हावं.

छंद असावा एकतरी,
तुला जे मनाने माझं मानलं,
ते अलगद शब्दांत उमटायला.

कसे ते तुझ्या रागाला आवरू,
नि तुझ्या प्रेमाला जपू,
हे शिकवणारा एखादा छंद असावा.

छंद असावा,
तुझ्यासंबंधी पुस्तकं वाचण्याचा,
तुझ्या न बोललेल्या शब्दांना समजून घेण्याचा.

छंद निदान तुला जपण्यासाठी असावा,

तुझ्या हसण्यात स्वतःला हरवण्यासाठी असावा,

तुझ्या डोळ्यांतील निःशब्द भावना वाचण्यासाठी असावा.

तुझ्याविना जगण्याचा मात्र

सराव नसावा...

कारण काही छंद

वेळ घालवण्यासाठी नसतात,

ते मन जपण्यासाठी असतात;

आणि काही माणसं,

आयुष्यभर जपण्यासाठी.

- कॅरल डिकोस्टा

(वसई, महाराष्ट्र)

मन्या इंजिनियर(विडंबन काव्य)

मन्या इंजिनियर फिरता फिरता
बघायाचा नुसत्याच पोरी;
म्हणायचा अन मनाशीच की
पटविन मी, हि सरिता गोरी;

मिचकावुनि मग उजवा डोळा
आणि उडवुनी डावी भिवयी,
भिरकावुनि ती तशीच ध्यायचा
लकेर बेचव जैसा गवयी.

ऑफिसातली ड्रॉईंग्ज बघणे;
जिग, फिक्स्चर, जॉब्ज अर्जंट,
ऑइल, तेल अन कुलंट नळिचे
चेकिंग करणे आकडे कोळित;

स्वप्नांवरती धूर सांडणे
क्वचित बिडीचा वा मशीनचा
धडधड जळत्या; आणि लेटणे
वाचित स्टोऱ्या रस्किनच्या.

गोरी सरीता उजून गेली
कोमल कविता गोष्ट राहिली;
चिमणी पाखरं उडून गेली;
मन्या आणि मशीन धडधड.

कंपनीतली लंबू बॉब कट
विचारण्याचा घाली घाट
एक दिवस ती हि पटली
अकाउंटंटला गप्पात गटली.

मुली मन्याने स्वप्नील्या ज्या ज्या
लगेच खपल्या उजल्या गेल्या,
मनातल्या मनात मन्याच्या
सदैव रुतल्या आणिक रुतल्या.

अमेरिकेची करिअरिस्टिक
नात्यातून ती आली अचानक;
ऊंच स्मार्ट अन भलतीच नीटस्
डॉलर्सची हि मन्यास ऑफर.

मन्या बिचारा हुशार बापडा
पोरी बघता राहून गेला;
पण, एक मागता गाड्या चार
देव देतसे नशीबवंताला!

- विनय भालेराव

(सहकार नगर , पुणे)



चिऊताई चिऊताई दार उघड!

ती लहान होती तेव्हा जेवण भरवताना तिची आई तिला एक गोष्ट सांगायची.

"चिऊताई चिऊताई दार उघड..."

गोष्ट तिला इतकी आवडायची की ती ऐकता ऐकता तिचं जेवण कधी पूर्ण व्हायचं तिला कळायचंच नाही. तिचं जेवण पूर्ण होईपर्यंत तिची आई मन लावून रंगवून–रंगवून गोष्ट सांगत रहायची आणि मग तीही त्या गोष्टीत पूर्णपणे रंगून जात आसुसून वाट बघत रहायची की 'चिऊताई' कधी दार उघडेल? पण तिचं जेवण संपलं तरी 'चिऊताई' दार काही उघडायची नाही! एकदा का तिचा शेवटचा घास खाऊन झाला की आई गोष्ट अर्धी टाकून आपल्या पुढील कामासाठी निघून जायची. ती कितीतरी वेळ आईभोवती रेंगाळत विचारत राहायची, "चिऊताई दार कधी उघडणार?"

मग आई गालातल्या गालात हसत म्हणायची...

"तिला वेळ मिळाला की उघडेल."

त्यावर तिचा पुढचा प्रश्नही तयारच असायचा...

"मग तोवर 'काऊ' तिच्यासाठी बाहेर थांबेल?"

ह्यावर तिची आई निरुत्तर होत, थबकून तिच्याकडे क्षणभर पाहतच राहायची! कारण तिच्या ह्या बालसुलभ शंकेचं निरसन करणारं उत्तर काही तिच्या आईकडे कधीच नसायचं!

ती जस्सजशी मोठी होत गेली तस्सतशी तिला 'चिऊताई'ची गोष्ट आपलीच वाटू लागली! तिची 'चिऊताई' तिच्यातल्या 'काऊ' चा शोध घेत राहिली. त्याला दार उघडण्यासाठी धडपडत राहिली. पण 'चिऊताई' ला 'काऊ' काही सापडेना नि दार काही उघडलं जाईना!

शालेय जीवन संपता संपता तिच्या आवडीनिवडी पक्क्या होत गेल्या नि मग त्याबरोबरच आपल्याला आयुष्यात नेमकं काय करायचं आहे हे ही मनाशी ठरत गेलं. पुढे महाविद्यालयात शिकता शिकता जगण्यासाठी आवश्यक दिशा निवडताना आपल्या आवडी–निवडी बाजूला सारून नाईलाजाने घेतलेले निर्णय मनात खोलवर साठत, खुपत, सलत राहिले. तेव्हाही इतकी वर्षे मनात खोलवर कुठेतरी दडून राहिलेला, पार तळाशी कुलुपात कडेकोट बंदोबस्तात असलेला 'काऊ' साद घालत राहिला –

"चिऊताई चिऊताई दार उघड..."

आणि मग तिची कधी 'चिऊताई' होत गेली हे तिचं तिला कळलंच नाही! मग ह्या 'चिऊताई'ची सबबीदाखल निरनिराळी उत्तरं पुढे येऊ लागली – "थांब जरा स्वतःला मार्गी लावते....", "थांब जरा आयुष्याला आकार देते..."

पण तरीही 'काऊ'चं साद घालणं मात्र सुरूच राहिलं...

"चिऊताई चिऊताई दार उघड..."

योग्य वयात तिचं लग्न लावून देत तिच्या आईने सुटकेचा निःश्वास टाकला त्यावेळीदेखील तिच्यातला 'काऊ' तिला साद घालतच होता पण

आईच्या चेहऱ्यावरच्या कर्तव्यपूर्तीच्या समाधानाच्या तेजात तिच्यातल्या 'काऊ'चे डोळे दिपत गेले नि तो काही काळ का होईना शांत झाला!

लग्नानंतरच्या नवलाईत ती सुखाच्या हिंदोळ्यावर कितीतरी काळ झुलत राहिली. घर आणि संसार ह्यातल्या तारेवरची कसरत, तोल ढळू न देता यशस्वीरीत्या पार पाडून दाखवताना तिच्यातला 'काऊ' तिला साद घालून घालून तिच्यासारखाच पार दमून गेला! तिला त्याची साद ऐकू येत होती पण त्याला प्रतिसाद द्यायला तिला मुळी सवडच नव्हती! त्यात बाळाच्या येण्याच्या चाहुलीने भर घातली आणि मग त्या आनंदात तिच्यातला 'काऊ' साद घालणं विसरूनच गेला!

पुढे बाळाच्या जन्मानंतर घर, संसार सांभाळत बाळाला मोठं करताना, त्याच्या पुढेमागे नाचताना तिच्यातला 'काऊ' आठवणीने दार ठोठावत राहिला नि दर वेळेला ती 'चिऊताई' बनून त्याला थोपवण्यासाठी उत्तरं देत राहिली –
'थांब माझ्या बाळाला आंघोळ घालते..."
"थांब माझ्या बाळाला खाऊ घालते..."

बाळाच्या संगोपनात तिने आपलं दार इतकं घट्ट बंद केलं होतं की हळूहळू पलीकडल्या तिच्यातल्या 'काऊ' ची सादही तिला ऐकू येईनाशी झाली होती! ह्या दरम्यान किती वर्षं गेली हे तिला कळलंच नाही. तिचं बाळ मोठं झालं...मार्गी लागलं. त्याचंही स्वतःचं आयुष्य, स्वतःचा संसार सुरू झाला.

आणि मग एक दिवस अचानक तिच्यातल्या 'काऊ' ने तिला पुन्हा एकदा साद घातली....
"चिऊताई चिऊताई दार उघड..."

तसं तिला वाटलं आता तरी आपल्याला वेळ मिळेल. तिने 'काऊ' ला प्रतिसाद देण्याची तयारी सुरू केली पण मग ती पुन्हा एकदा बंधनात अडकली. ह्या वेळी आपल्या बाळाच्या संसारवेलीवर नव्याने फुटणाऱ्या पालवीच्या चाहुलीने तिला बांधून ठेवलं! नेहमीप्रमाणे तिने तिच्यातल्या 'काऊ' ला उत्तरं द्यायला सुरुवात केली –
"थांब माझ्या बाळाला.....!!!"

बाळाचं बाळ हळूहळू मोठं होऊ लागलं. पुन्हा एकदा ही बदललेली भूमिका नीट वठवताना तिचं स्वत्व नि तिचा संसार ह्यातल्या तारेवरची कसरत तोल ढळू न देता यशस्वीरीत्या पार पाडून दाखवताना तिच्यातला 'काऊ' तिला साद घालून घालून तिच्यासारखाच पार थकून गेला!

बाळाचं बाळ म्हणजे तिची नात, आता मोठी होत होती. जेवण भरवताना तिलाही गोष्ट सांगावी लागत होती. तिची गोष्ट नातीला इतकी आवडायची की ती ऐकता ऐकता तिचं जेवण कधी पूर्ण व्हायचं तिला कळायचंच नाही. तिने नातीला गोष्ट सांगायला सुरुवात केली....
"चिऊताई चिऊताई दार उघड..."

प्रत्येक स्त्रीच्या मनात इतकी वर्षं खोलवर कुठेतरी दडून राहिलेल्या, पार तळाशी कुलुपात, कडेकोट बंदोबस्तात असलेल्या पण वेळोवेळी सतत साद घालणाऱ्या – इच्छा, आकांक्षा, ध्येय, उद्दिष्टं, स्वप्नं, लक्ष्य – ह्या साऱ्या अपूर्त बाबींनी बनलेल्या प्रातिनिधिक 'काऊ' ची गोष्ट –
"चिऊताई चिऊताई दार उघड..."

गोष्ट संपता संपता शेवटच्या घासाला तिच्या नातीने आसुसून विचारलं,
"चिऊताई दार कधी उघडणार?"
आणि मग ती गालातल्या गालात हसत पण निर्धाराने म्हणाली.

"राणी...दार वेळेवर उघडायचं असतं हं! 'काऊ' ला असं ताटकळत वाट पहायला लावायची नसते! दार उघडायला उशीर झाला नं, तर मग 'काऊ' उडून जातो...कायमचा!!!"

- शिल्पा गुप्ते जोशी

(कांदिवली, मुंबई)

स्वप्नातली शाळा

"मोनू, बाळा अरे उठ, किती उशीर झाला! शाळेत नाही जायचे का? अभ्यास झाला आहे का? नाहीतर ऐनवेळी मला धावपळ करायला लावशील. अरे उठ लवकर!"

मीराची वटवट चालू होती. सोबत पसारा आवरणंही चालू होतं. पण मोनू उठण्याची चिन्हं दिसत नव्हती.

"मोनू, बाळा अरे उठ!" मीराने पालुपद चालूच ठेवलं होतं. शेवटी तिने त्याच्या अंगावरचे पांघरूण ओढून घ्यायचा प्रयत्न केला, तर मोनू ते अधिकच घट्ट पकडत, "झोपू दे गं आई, आज शाळेला सुट्टी आहे." असे म्हणाला.

"काय? आज कसली सुट्टी? काल तर काही बोललाच नाहीस?" मीराचे एकावर एक प्रश्न सुरूच होते.

"अगं काल नाही, तर आताच बोलल्या मुख्याध्यापिका बाई"

"आता? म्हणजे महाराज झोपेतच आहेत अजून! "

"नाही गं, खरंच! आता आम्हाला शाळेत जायला लागणार नाही, शाळाच घरी येणार! तेही आम्ही सांगू तेव्हा आणि आम्ही सांगू तसं !"

"म्हणजे?"

"नवीन शैक्षणिक धोरण!"

"काय?"

"होय, आठवड्यातून ५ दिवस शाळा, २ दिवस सुट्टी! आणि या २ दिवसांसाठी पालकांना होमवर्क देणार!"

"हे काय नवीन?"

"हो, पालकांनी या दोन दिवसात आम्हाला बाजारात घेऊन जायचं, देवाण– घेवाण, व्यवहार, फायदा– तोटा हे प्रत्यक्ष शिकवायचं. वेगवेगळ्या ठिकाणी, पर्यटनस्थळी नेऊन तिथले निसर्गसौंदर्य दाखवणं, तिथला इतिहास सांगणं, भूगोल शिकवणं हे आवश्यक आहे. हॉटेलमधले खाद्यपदार्थ आरोग्यासाठी कसे घातक आहेत ते प्रत्यक्ष अनुभवातून पटवून द्यायचा प्रयत्न करणं गरजेचं आहे. असं बाई म्हणाल्या."

"बाप रे!"

"आणि या सगळ्या होमवर्कची नोंद करून, सोबत फोटो वगैरे आमच्या शिक्षकांना दर आठवड्यात मेल करायचे!"

"आणि इतर ५ दिवस?"

"आम्ही सांगू त्या विषयाचे शिक्षक, सांगू त्या वेळी, आम्हाला घरी येऊन शिकवतील. प्रत्येकाला आपल्या आवडीचे विषय घेता येतील. घरी शिक्षक येतील त्यामुळे शाळेत जायची कटकट नाही, पालकांना काळजी नाही, स्कूल बस नसल्याने अपघाताची भीती नाही. किती मस्त ना! "

"आणि वेळ?"

"आम्ही सांगू त्या प्रमाणे! शक्यतो उशिराच! एवढ्या सकाळी कोण उठणार? तसं आम्ही खेळाचे, चित्रकलेचे तास जास्तच घेणार."

"अरे व्वा!"

"आम्हाला दिलेले प्रोजेक्ट आम्हीच पूर्ण करायचे आहेत. तसं व्हिडिओ रेकॉर्डिंग सोबत पाठवायचं आहे. आई–वडिलांनी पूर्ण करायचं नाही."

"हो का? आणि परीक्षा?"

"वर्षातून एकदाच! तीसुद्धा तोंडी व प्रॅक्टिकल! अगदी पूर्वीच्या काळी गुरूकुलात व्हायची तशी. पेपर नाही, म्हणजे पेपर फुटणारही नाही. पेपर तपासणं नाही म्हणजे त्यात होणाऱ्या चुका नाही, पक्षपात नाही आणि टक्केवारीसुद्धा नाही! त्यामुळे पहिला, दुसरा असं काही नाही."

"अरे व्वा! मज्जाच मज्जा!"

"मग काय, लहानपणापासून आमचा खूप छळ चालू आहे. येता जाता अभ्यास, फक्त अभ्यास, शाळा आणि क्लास! सुट्टीमध्ये सुद्धा इतर क्लासेस असतातच! खेळायला, उड्या मारायला मिळतच नाही."

"असं का?"

"त्यामुळे शिक्षणाने सर्वांगीण विकास की काय व्हायला पाहिजे तो होतच नाही. नुसती घोकंपट्टी आणि पुस्तकी किडे तयार होत आहेत असे म्हणतात. पदवी, पदव्युत्तर शिक्षण झाले तरी इंटरव्ह्यू मध्ये भोपळा असे बरेच जण सांगतात. मग उपयोग काय एवढं शिकून आणि अभ्यास करून? म्हणून हे नवीन शैक्षणिक धोरण, असं बाई सांगत होत्या."

मोनूची अशी कितीतरी वटवट चालू होती. शाळेला दांडी मारण्यासाठी मोनूचा हा उपद्व्याप आहे असं मीराला वाटत होतं. मीराने तिची मैत्रीण रीटाला फोन लावला. रीटाऐवजी तो सोनूने उचलला, " हॅलो, कोण?"

"अरे सोनू, आज शाळेला सुट्टी आहे का?"

"नाही, कोण म्हणतं? मोनू का?"

"हो, अजून अंथरूणातच आहे."

"नाही काकू, उलट आज मराठीच्या तासाला 'माझी शाळा' हा निबंध लिहायचा आहे."

"तेव्हाच! आमचा निबंध स्वप्नातच तयार झाला वाटतं." असं म्हणत मीराने फोन ठेवला.

आता मीराने मोनूला धपाटा घालत उठवून बाथरूममध्ये ढकललं.

"आई खरंच, आज शाळेला सुट्टी आहे. तुला माहीत नाही." अजूनही मोनूचं पालुपद चालूच होतं.

मीरालाही मनातल्या मनात काही गोष्टी पटत होत्या, काही नव्हत्या पटत. पण काहीतरी चुकतंय असंही थोडं वाटत होतं. तुम्हालाही असंच वाटतं का? तुम्हाला कशी वाटली मोनूची स्वप्नातली शाळा?

'अशी असावी माझी शाळा
जी मनापासूनी लावित लळा!'

- कैलास विमल भाऊलाल बडगुजर

टिटवाळा, महाराष्ट्र

ध्येयवेडी माणसे

नांदेडमध्ये गांधी रोड वरील "अपंग व्यक्ती" जेव्हा जेव्हा मी बघत आले ना तेव्हा, मनामध्ये एक विचार नेहमी यायचा! हे लोक मनाने फार खंबीर असतात. शरीराने भलेही अपंग असोत, पण ती ध्येयवेडी असतात. त्यांच्यात वादळ शमवण्याची ताकत असते. ही लोक मनाला एवढं खंबीर बनवतात, की सामान्य माणसापेक्षा ते सक्षम बनतात.

बऱ्याचदा बघते की धडधाकट लोकसुद्धा रस्त्यावर भीक मागताना दिसतात. तर काही लोक आयुष्यभर दुसऱ्यावर दोष टाकून रिकामटेकडेपणाने आयुष्य जगत राहतात. परिस्थिती कधीच ध्येयाच्या वाटेत येत नाही हे या माणसाला बघून कळते. "अरे! माझ्याकडे पैसे नव्हते, असते मी हे केले असते. अरे, माझ्या आई–वडिलांनी साथ दिली नाही, नाहीतर मी कुठल्या कुठे राहिलो असतो! पैसे नव्हते म्हणून मी मागे राहिलो." मुळात हे रिकामटेकडया माणसांचे लोकप्रिय बहाणे आहेत.

माणूस जिद्दीला पेटला ना तर तो काहीही करू शकतो. माणूस मुळातच एखाद्या वादळासारखा असतो. एकदा मनाने ठरवले की, बाबा रे...! तुला थांबायचे नाही हा! तुला हे करायचेय! मग मन तरी कुठे शांत बसते? ते पळते त्या ध्येयाच्या वाटेने! कधी कधी असं होतं की, किरकोळ कारणामुळे देखील मुले नैराश्यात जातात. कारण काय परीक्षेमध्ये नापास झालो अथवा कमी गुण मिळाले. पण ही परीक्षा तुम्ही केलेल्या

अभ्यासाचे गुण दर्शवते. तुमच्यात असलेल्या इतर कलांचे नाही. बऱ्याचदा अशीही काही लोकं भेटतात की, जी त्यांच्या दुःखाचे रडगाणे मांडत राहतात. हे सगळं माझ्याच नशिबात का ? ह्या सगळ्यांची उत्तरे तुम्हाला एखाद्या सरकारी दवाखान्यात गेल्यावर मिळतील . तिथे बघा लोक कसे जगतात, कसे आयुष्य काढतात, त्यांचा दिवस कसा सुरु होतो आणि कसा संपतो.

रेल्वे स्टेशन असो का बस थांबा बऱ्याचदा असे लोक निदर्शनास पडतात जे पायाने अपंग असतात किंवा अंध असतात पण तरी ते त्यांना जमेल त्या कलेतून स्वतःचे अस्तित्व निर्माण करतात. बऱ्याचदा अपंग, अंध असणारी व्यक्ती गाणे गाताना दिसते. तर कधी एखादा अपंग व्यक्ती बसल्या ठिकाणी पुस्तक विकताना. जर थोडे निरीक्षण केले ना तर लक्षात येते की, हे लोक त्या प्रत्येक माणसांना प्रेरित करतात जे लोक "आयुष्याला कंटाळलो" हे शब्द नेहमी–नेहमी उच्चारतात. हे लोक त्या माणसांना पण मार्गदर्शन करतात ज्यांच्या वाटेला संघर्ष येतो व दुःखाच्या प्रसंगातून समोर जात असतात. हे लोक त्या प्रत्येक व्यक्तीसाठी संदेश देतात जे हातपाय असून सुद्धा रिकामटेकडी बनून घरात नागोबा सारखी नुसते बसून राहतात आणि ही लोक त्या व्यक्तींसाठी पण प्रेरणा ठरतात जे आयुष्यात खूप प्रयत्न करून देखील अपयशाला समोर जातात.

प्रयत्न करत असताना अपयश वाट्याला येतेच पण त्याच अपयशातून यशाकडे जाणारा दांडगा अनुभव सोबत मिळतो, हे विसरायला नको.

मर्यादित काळाचा किरकोळ संघर्ष करून माणूस नशिबाला कित्येकदा दोष देत राहतो. आयुष्यात खाल्लेल्या खस्ता, आयुष्यात आलेले वाईट अनुभव आपण इतरांना अगदी गळा काढून सांगतो. पण आपण हे विसरतो की, जगात अशी अनेक माणसे आहेत ज्यांच्या नशिबात अख्या आयुष्यभराचा संघर्ष लिहिलेला असतो, ज्याच्यास्वप्नांचे पंख जन्मतःच छाटले गेलेले असतात, तरी देखील ती रडत नाहीत. ती लढतात. स्वतः मध्ये असणाऱ्या कमतरतेवर ते विजय मिळवतात आणि अपंग असून देखील ते स्वकष्टाने व स्वाभिमानाने आपल्या पोटाची खळगी भरतात. ही लोक शरीराने भलेही कमकुवत असले तरी देखील ती त्यांच्यातल्या अपंगत्वावर मात करून परिस्थितीवर विजय मिळवतात.

- ज्योती कुंडलिक पतिंगराव

(कळमनुरी, जि. हिंगोली)

शेतकऱ्याचं जगणं

शेतकऱ्याचं जगणं सांगा, कोण उरसनं घेतं का?
साऱ्या जगाला पोसणाऱ्याचं जगणं थोडं जगून बघता का?

पोराबाळांना आश्वासन देऊन थकलेला बाप,
आणि बायकोला "चांगले दिवस येतील" असं सांगत घुसमटलेला श्वास.

एवढीच काय ती ऐपत त्याची, रोजची त्याची कसरत, थोडी करून बघता का?

शेतकऱ्याचं जगणं सांगा, कोण उरसनं घेतं का?
साऱ्या जगाला पोसणाऱ्याचं जगणं थोडं जगून बघता का?

पिकावर आस लावून बसलेला तो रात्रंदिवस,
कधी दुष्काळ, तर कधी पूर आणि अवकाळी पाऊस.
दुष्काळात चाऱ्यावाचून तडफडलेली ती जनावरं,
आणि पुरात वाहून गेलेली ती पोरांची पाटी अन् दप्तरं.

डोळ्यांदेखत तोंडचा घास हिरावून गेलेला तो क्षण, थोडा अनुभवून बघता का?

शेतकऱ्याचं जगणं सांगा, कोण उरसनं घेतं का?
साऱ्या जगाला पोरसणाऱ्याचं जगणं थोडं जगून बघता का?

भाव तो कवडीमोलाचा,
आणि बाजारपेठेत हात दलालाचा.
बिनभावाचा तो माल,
आणि भोगलेले ते हाल.

कर्जाचा डोंगर आणि गहाण ठेवलेली जमीन, सांगा, कोणी सोडवून आणता का?

संपलेली ती जगण्याची आशा, सांगा, कोण परत आणतं का?
सोडून लेकराबाळांची अन् संसाराची ओढ, सांगा, असंच कोण फास घेतं का?

शेतकऱ्याचं जगणं सांगा, कोण उरसनं घेतं का?
साऱ्या जगाला पोरसणाऱ्याचं जगणं थोडं जगून बघता का?

- सनहा पठाण

(अकलूज, जि. सोलापूर)

नवजीवन

काजव्यासारखा लोभस आधार तुझा,
वाट दाखवशील या काळोखात,
मृत्यूला लटकवून आलोय आज वेशीवर,
हात तुझा हाती, जगेन याच आशेवर.

कितीदा हाताला तू हात दिलास,
मोजदाद नाही या कृतज्ञ जीवाला,
निराशेच्या अथांग गर्तेतून खेचून आणले,
तूच माझ्या भरकटणाऱ्या मनाला.

काळीज तुझेही विदीर्ण होते, जखमा तुझ्याही खोल होत्या,
माझ्या अश्रूंच्या धारांपेक्षा, तुझ्या मूक वेदना थोर होत्या.
स्वतः वादळात उभा राहून, तू मला किनाऱ्यावर तारले,
निःस्वार्थी मनाच्या या 'सख्याने', मला पुन्हा जगणे शिकवले.

तुझ्याच दिव्य साथीने मिळाली,
माझ्या कोमेजल्या आयुष्याला नवी दिशा,
तू पाठीशी ढाल म्हणून असताना,
फिकी पडेल आता मृत्यूची ती निशा.

संकटांची वादळे कितीही येऊ दे आता,
ही पावले माझी कधी डगमगणार नाहीत,
हात तुझा पाठीवर खंबीर असताना,
हे डोळे पुन्हा कधी अश्रू ढाळणार नाहीत.

ना नात्याचे कोणते साकळे,
ना कसली अपेक्षा या मनात,
तुझ्यासारखा देवमाणूस 'सखा' मिळायला,
पुन्हा जन्म घ्यावा लागेल या जगात..

- गोरक्षनाथ अच्युतराव देवकर

(जिंती, करमाळा, जि. सोलापूर)

(शब्दार्थ : साकळे = बंधन)

पारिजातकाचं आयुष्य

"पारिजातकाचं आयुष्य लाभलं तरी चालेल; मात्र लयलूट करावी ती सुगंधाचीच!"

"गेलेल्या क्षणांना" मोकळीक द्यावी, वर्तमानात जगण्याची ओढ मात्र हवी. भविष्याच्या स्वप्नांना पंखाचे बळ द्यावे..आयुष्याच्या प्रवासात नेहमीच आनंदी असावे. स्मृतीच्या गाठी सोडून द्यावे अन् नव्या क्षणांना मात्र मिठीत घ्यावे. प्रत्येक दिवस हा एका नव्या आशेनं उजळावा. मनाच्या आकाशात इंद्रधनु रंगवावा. जीवनाच्या वाटेवर चालत राहावं, प्रत्येक क्षण मनात साठवून ठेवावा. सुखदुःखाच्या लहरींना कवेत घ्यावं आणि हसत हसत या जीवनाचा आस्वाद व आनंद घ्यावा! आठवणी जपून ठेवाव्यात पण जखमा मात्र विसरून जाव्यात. दुःख कधीच साठवून ठेऊ नये पण आनंदाचा मात्र उत्सव साजरा करावा!

आपण मोबाईलची मेमरी फुल्ल झाली की "क्लीन" करतो पण मनाची मेमरी कधीच क्लीन करत नाही. रोजच्या रोज आपल्या मनातील कचरा एका कागदावर उतरावा आणि त्याला जाळून टाकावे. कारण आपलं रिकामं मन हे "आनंदाच घर" असतं! त्यामुळे त्या मनाला वरचेवर आपण स्वच्छ करत रहायला हवं.

ज्यावेळेस आपण फोटो काढायला थांबतो त्यावेळेस फोटोग्राफर आपल्याला म्हणतो "स्माईल प्लीज!" कारण आपला फोटो चांगला आला पाहिजे. आपल्या दोन क्षणाच्या हसण्यामुळे जर फोटो सुंदर येत असेल

तर मग नेहमीच आपल्या चेहऱ्यावर हास्य असेल तर आपलं जीवन एक हसरं नंदनवन बनेल. म्हणूनच नेहमीच हसत रहा, इतरांना हसवत रहा, जीवनातील आनंद मनमुराद घेत रहा! कारण आयुष्यात येणारी वेळ ही आपल्यासाठी कधीच थांबत नसते; ती एखाद्या वाहत्या नदीसारखीच असते. एकदा स्पर्श केलेल्या पाण्याला तुम्ही पुन्हा स्पर्श करू शकत नाही कारण त्या नदीच्या प्रवाहाबरोबर गेलेलं पाणी कधीही परत येत नाही. वेळेचेही असेच असते. एकदा गेलेली वेळ परत येत नाही. म्हणूनच आयुष्यातील प्रत्येक क्षणांचा पुरेपूर आनंद घेत चला!

तसं बघितलं तर पारिजातकाचं आयुष्य हे अतिशय कमी असतं. त्याची फुलं किती नाजूक असतात. झाडाला हात लागताच फुलं गळून पडतात पण त्याचा सुगंध इतका मनमोहक असतो की, आपण त्यात न्हाऊन निघतो. म्हणूनच जीवनात आपल्याला पारिजातकाचं आयुष्य लाभलं तरी चालेल, मात्र लयलूट करायची ती सुगंधाचीच! पारिजातकाचं ते फूल जाता जाता सुगंधाची गोड स्मृती आपल्या हातात ठेवून जाते.
आपला या ठिकाणचा प्रवास संपला तरी आपल्या आठवणीचा, विचारांचा सुगंध दरवळत राहायला हवा तरच आपल्या येण्याचं सार्थक होईल.

इथे आपल्याला मिळालेल्या या भूमिकेत कोण पूर्णपणे योग्य आहे अथवा कोण पूर्ण आहे? प्रत्येकजण कुठे ना कुठे थोडासा अपूर्ण आहेच! हे जीवन म्हणजेच एक सुंदर स्वप्न आहे. आयुष्यातील हा प्रवास म्हणजेच एक कोडं आहे अन् सोडवाल तितकंच ते थोडं आहे. आपल्या प्रयत्नात मात्र खंड पडता कामा नये. जिथे जगण्याची उत्कट इच्छा असायला हवी.

दुःख आपोआप खुशीत बदलून जातील फक्त चेहऱ्यावरील हास्य ढळू न देण्याची स्वय अस्सायला हवी! दृष्टिकोन बदलला तर दृश्य आपोआप बदलेल! "नजर बदलो तो नजारें अपने आप बदल जायेंगे!"

जीवनात काही नाती अस्से अस्सतात की ते बंद दरवाजे उघडून जातात एकतर आपल्या हृदयाचे किंवा डोळ्यांचे. श्वास हे कधीच कोणाचीच वाट बघत नाहीत. एकतर ते चालूच अस्सतात किंवा चालले जातात. चिंता इतकी करायला हवी की आपलं काम व्हायला हवं. परंतु इतकी पण नक्कीच नाही की आपलं कामच तमाम व्हायला हवं!!

- निळकंठ बाबाराव पाटील मैलापुरे

(छ. संभाजीनगर, महाराष्ट्र)

माझी आठवण येईल का?

क्षणाक्षणाला येतो जातो
श्वासापुढे चालते कोणाचे?
निघून जाता अडे ना काही
अश्रुही फक्त अल्प काळाचे

आभासी जगी वारे न्यारे
मुखवट्यात दडती चेहरे
आपले परके भेद न उमगे
सुगंधाविना सजती गजरे

गुंतून पडती द्वेष–असुयेत
कर्म, कर्तव्य दूर सारून
तोडती बंध माणुसकीचा
अपेक्षांचा ढिगारा रचून

नसे ध्यानी 'मी' काय केले
पिटे चोहीकडे दुर्गुण डंका
'मी'च्या चक्रात अडकूनच
भस्म झाली होती की लंका!

का पडावा प्रश्न उगा मना
माझी आठवण येईल का?
जीवन पानावर स्वर्णाक्षरी
नाव कोरलेले आहेस का?

स्वार स्मृतींच्या लहरींवर
मोहक अस्तित्व ठसे मागे
लाखात एक उठून दिसत
कशिद्यातले हसतात धागे

- सौ. मनिषा दिपक पाटील

(पालकाड,केरळ)

उणीव

आई गेली त्या दिवशी
घरातला दिवा विझला नव्हता,
पण उजेड मात्र हरवला होता...
अकरावीच्या वहीत अजून
स्वप्नांची अक्षरं जिवंत होती,
पण नियतीने अचानक
आईची सहीच पुसून टाकली होती...

त्या दिवसानंतर
घर तेच राहिलं, माणसंही तीच राहिली,
पण "आपलं" वाटणारं उबदारपण
हळूहळू हरवत गेलं...

वडील होते समोर,
पण शब्दांत माया नव्हती,
कर्तव्यांची सावली होती,
पण कुशीतली ऊब नव्हती...

रात्रभर मन रडायचं,
पण डोळ्यांना रडण्याची मुभा नव्हती,
कारण घरात दुःख होतं,
पण दुःख समजून घेणारी मिठी
नव्हती...

"कसा आहेस रे?"
हा साधा प्रश्नही
मनातल्या कोरड्या जमिनीवर
पावसासारखा वाटला असता...
पण काही ऋतू
नशिबातच आले नाहीत...

मग स्वतःच स्वतःचा आधार झालो,
जखमांनाच सोबती मानलं,
आणि न बोललेल्या वेदनांनाच
मनात घर करून दिलं...

कॉलेजच्या वाटेवर
पाय थकत होते, मनही तुटत होतं,
पण मागे वळायला कुणी नव्हतं,
म्हणून पुढे चालत राहणं भाग होतं...

पुस्तकांच्या पानांत
मी आईचा स्पर्श शोधत राहिलो,
आणि शांततेच्या भिंतींमध्ये
वडिलांची हरवलेली माया...

रात्रभर अभ्यास करताना
कधी भूक लागायची, कधी मन
हरवायचं,
पण डोक्यावर हात ठेवून
"मी आहे" म्हणणारं कुणी नव्हतं...

म्हणून अश्रूंनाच शाई केलं,
वेदनांनाच गुरू मानलं,
आणि एकटेपणालाच सोबत घेऊन
स्वप्नांचा प्रवास पूर्ण केला...

आज विद्यार्थ्यांसमोर
"प्राध्यापक" म्हणून उभा असतो,
टाळ्या वाजतात, सन्मान मिळतो,
पण आत कुठेतरी
एक मुलगा अजूनही शांत बसलेला
असतो...

जो आईला शोधतो...
आणि वडिलांच्या न मिळालेल्या मायेची
आजही नकळत वाट पाहतो...

कारण काही जखमा
वेळ भरून काढत नाही,
त्या फक्त जगायला शिकवतात...
आणि त्या जखमांवर उभं राहूनच
एक साधा मुलगा
प्राध्यापक बनतो...॥

- शिवाजी पी. मगर

(फैझपूर , जि. जळगाव)

ECHOES

खरं जीवन मृत्यूनंतर आहे का?

"मृत्यू" हा शब्द ऐकताच मनात भीती, प्रश्न आणि कुतुहल एकाच वेळी जागे होते. पण कधी विचार केला आहे का?—'आपण मृत्यूला शेवट का मानतो?'. कदाचित तो शेवट नसून एका नव्या प्रवासाची सुरूवात असेल.

जन्म झाला की मृत्यू अटळ आहे. पण मृत्यू म्हणजे अस्तित्वाचा अंत की एका वेगळ्या आयामात प्रवेश? या प्रश्नाचे उत्तर विज्ञानाकडे पूर्णपणे नाही आणि श्रद्धेकडे निश्चित आहे. म्हणूनच हा प्रश्न बुद्धीपेक्षा मनाला अधिक स्पर्श करतो.

आपण आयुष्यभर शरीरासाठी जगतो, पण शरीर हे कायमचे नसते. कायम राहतात ती आपली कर्मे, आपले संस्कार आणि इतरांच्या मनात जपली गेलेली आपली आठवण. म्हणूनच कदाचित "खरं जीवन" हे फक्त श्वास घेण्यात नसून, आपण मागे ठेवलेल्या मूल्यांमध्ये असते.

जर मृत्यूनंतरचे जीवन असेल, तर आजचे जीवन ही त्याची तयारी आहे. आणि जर मृत्यूनंतर काहीच नसेल, तरीही चांगुलपणाने जगलेले आयुष्य कधीच व्यर्थ ठरत नाही. कारण माणूस आपल्या संपत्तीने मोठा होत नाही; तो आपल्या स्वभावाने, करूणेने आणि कर्माने मोठा होतो.

मृत्यूचे गूढ कदाचित कधीच पूर्ण उलगडणार नाही. पण एक गोष्ट नक्की आहे, जो व्यक्ती प्रत्येक दिवस प्रामाणिकपणे, प्रेमाने आणि इतरांच्या भल्याचा विचार करून जगतो, त्याला मृत्यूची भीती कमी वाटते. कारण त्याने जगण्याचा अर्थ शोधलेला असतो.

म्हणून प्रश्न असा नाही की खरं जीवन मृत्यूनंतर आहे का? प्रश्न असा आहे की, मृत्यू येण्यापूर्वी आपण खरंच जगलो का?

- प्रथमेश प्रभुतेंडोलकर

(केळवे बाजार, जि. पालघर)

ती

चालताना चहूबाजूला पाहिलं, पण ती दिसत नव्हती. थोडं बेचैन वाटलं. यायला उशीर झाला असेल म्हणून ती वाट पाहून निघून गेली असावी, असंही वाटलं. काही दिवसांपासून ती यायची. कोण? कुठली? कोठून येते? तिचा ठावठिकाणा काय? काहीच माहीत नव्हतं. पण ती रोज यायची आणि उगीच भारी भरत आमच्यासोबत खेळायची. पायाजवळ घुटमळत असायची. तशी सुरुवातीला थोडी भीतीही वाटायची; पण लहानपणी तिच्या साऱ्यांचे अनुभव घेतल्यामुळे ते भय दूर झालं होतं. चालता चालता तिच्याशी बोलत होतो. ती आनंदाने मस्तीखोर उड्या मारत होती. जवळ बोलवलं की दूर पळत होती. पुन्हा मागून येऊन पायाला खेटण्याचा प्रयत्न करीत होती. थांबलो की घाबरून दूर पळत होती. तरी मन हलकं करणारे तिच्या सोबतचे सकाळचे क्षण छान वाटत होते. म्हातारपण आलं, तरी तिच्यासोबत लहानपण अनुभवत असल्यासारखं वाटत होतं; पण ते वाटणं स्थायी नव्हतं. वयाचं वास्तव वेगळंच होतं.

घराच्या पाठीमागील शेतात काही प्लॉट पडलेले होते. रोज सकाळी फिरायला गेलो की आम्ही पती–पत्नी रस्त्याच्या कडेला असलेल्या शेतातून एक फेरी मारायचो. त्यात अर्धा तास सहज निघून जायचा. एक कुत्री त्या शेतात रोज यायची. सुरुवातीला तिच्याकडे फारसं लक्ष गेलं नव्हतं. नंतर का कुणास ठाऊक, तिला आम्ही जवळचे वाटलो असू. ती आमच्या मागे मागे यायची. अगदी पायाजवळ चालायची.

ना ओळख, ना पाळख, ना ती आमची पाळलेली. पण ती जवळ येऊन मस्ती करायला लागली की बायको घाबरायची. म्हणायची, "हाड! हट! जा रे तिकडे!"

मी म्हटलं, "तो कुत्रा नाही, कुत्री आहे."
"तुमच्या नशिबात तर कुत्र्याच आहेत!" बायकोने गमतीने टोमणा मारला.
मीही हसत म्हणालो, "दुर्दैव माझं! बाकी आल्या, तशा गेल्या; पण तू एक अशी आलीस की कायमचीच राहिलीस."

बायकोला राग आला असावा. ती काही बोलली नाही. कुत्रीला घाबरत होती. मग बाईला पुढे करून मी मागे झालो आणि त्या कुत्रीशी खेळू लागलो. लहान पिले एकमेकांशी दंगामस्ती करतात तसे आवाज काढत ती उड्या मारत होती. मला गंमत वाटत होती. भीती वाटत नव्हती. कारण लहानपणी आम्ही एक कुत्री पाळली होती. तिचं नाव 'सख्खू' ठेवलं होतं. तिच्याशी खेळताना तिचं जे वर्तन होतं, तसंच या कुत्रीचंही होतं. त्यामुळे तिची आणि माझी गट्टी जमली होती. तिलाही आनंद होत असावा; पण घरी परत येताना ती घरापर्यंत यायची नाही. "घरी आलीच तर तिला भाकर–तुकडा देता येईल," असं वाटायचं. पण ती अर्ध्यातूनच परत फिरायची. कुठे जायची, काहीच पत्ता नव्हता. शिवाय दिवसभर तिचं दर्शनही होत नव्हतं.

एकदा तिच्यासाठी खिशात पोळी घेऊन गेलो होतो. ती खूश झाली. पोळी खाऊन झाली की ती जवळ येईल, तिची भीती दूर होईल आणि मग

अगदी बालपणी खेळलो तसे तिच्याशी खेटून खेळता येईल, असं वाटलं होतं. पण पोळी खाऊन झाल्यानंतर ती आमच्याकडे आलीच नाही. तिला बोलावलं, तर माझ्या आवाजाकडे तिने दुर्लक्ष केलं. तिच्या नजरेस एक काळा, निळा, तपकिरी आणि लालसर छटा असलेला रंगीबेरंगी भारद्वाज पक्षी पडला आणि ती त्याच्या मागे धावू लागली. मला आश्चर्य वाटलं.

"पोटात पडलं आणि ही बोलावूनही येत नाही! उलट भलतीकडेच उड्या मारत आहे!"

मग वाटलं, तिचा तरी काय दोष? माणूस असो की प्राणी, ज्याच्या त्याच्या मनाचा प्रश्न असतो. प्रत्येकाला आपलं स्वातंत्र्य प्रिय असतं. आकर्षण आणि लोभ दुःख देऊन जातात. एकटेपण चांगलं असूनही नकोसं वाटतं, कारण कुठल्या ना कुठल्या सहवासाची लहानपणापासून सवय झालेली असते.

तिच्यासोबत थोडा विरंगुळा होईल या आशेने तिच्याशी मैत्री केली होती. पण भीती, शंका आणि नकारात्मक विचार आपल्याला नवीन गोष्टी करण्यापासून रोखतात, हे अनेकदा लक्षातही येत नाही. माणसासारखी बुद्धी थोडीच होती तिला! खरं समाधान इतरांना खुश करण्यात नसतं; ते स्वतःला समजून घेण्यात असतं, अशी मनाची समजूत घालत तिच्याकडे दुर्लक्ष केलं. तरी त्या पक्ष्याच्या मागे धावताना तिला पाहून गंमतही वाटत होती. सकाळच्या शुद्ध हवेत, निसर्गाच्या सान्निध्यात मन ताजेतवाने होत होतं.

युट्यूबवर प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ कार्ल युंग यांच्या The Red Book ची समरी ऐकत होतो. त्यात सांगितलं जात होतं की, सततचा गोंधळ, सोशल मीडिया आणि बाह्य जगातील व्यस्तता आपल्याला स्वतःपासून दूर नेतात. शांततेत आणि एकांतातच अनेकदा आपल्या मनातील खरे प्रश्न आणि त्यांची उत्तरे सापडतात. हे ऐकल्यावर वाटलं—
"आपण इथे एकांतात फिरायला येतो, माणसांच्या जगापासून दूर. आत्मलीन व्हावं म्हणून. आणि इथेही कुत्रीशी खेळून मनाची शांतता बिघडवून घेतो आहोत!"

जुनी ओळख, जुन्या सवयी आणि मर्यादित विचार सोडल्याशिवाय नवीन व्यक्तिमत्त्व घडत नाही. प्रत्येक मोठा बदल हा जुन्या 'स्व'च्या मृत्यूसारखा आणि नव्या 'स्व'च्या जन्मासारखा असतो. पैसा, प्रसिद्धी किंवा बाह्य यश यात कायमस्वरूपी समाधान मिळत नाही. आत्मजाणीव, अंतर्मनाशी जोडलेपण आणि स्वतःची स्वीकृती यातून खरी शक्ती मिळते. असं बरंच काही ऐकत घरी परतलो. पुन्हा त्याच घाईगर्दीला सामोरं जाण्यासाठी. तरीही मनाच्या एका कोपऱ्यात विचार येऊन गेला.

"उद्याही तिच्यासाठी भाकर–तुकडा काढून ठेवायचा... आणि सोबत घेऊन जायचा."

- डॉ. मनोहर सुरवाडे

(फैजपूर जि. जळगाव)

उल्लेखनीय

ई–विविधाचे लेखक श्री. गोरक्षनाथ देवकर ह्यांनी "ई–विविधा"मध्ये एक कथा लिहिली व त्यांना त्यातून पुढील कथावस्तू सुचत गेली. त्यातून त्यांची "बकुळीची सावली" ही कादंबरी जन्माला आली. तिचे प्रकाशन आपल्या "ई–साहित्य प्रतिष्ठान"ने केले आहे. त्यासाठी लेखकांचे अभिनंदन!

त्यांनी ई–विविधा उपक्रमाबद्दल आपल्या मनोगतात उल्लेख केला ह्यासाठी त्यांचे आभार!



वरील मुखपृष्ठावर क्लिक करून त्यांचे पुस्तक वाचू शकता.

आधीचे अंक तुम्ही
इथे वाचू शकता!

फक्त फोटोवर क्लिक
करा आणि वाचा!

अंक कसे वाटले?
नक्की कळवा!

हा अंक कसा वाटला? आम्हाला नक्की कळवा!

पुढील अंकात साहित्य पाठविण्यासाठी खालील लिंकवरच्या गुगल फॉर्ममध्ये आपली माहिती भरा आणि साहित्य जोडा. सर्व सूचना, नियम आणि अटी फॉर्म मध्ये दिलेल्या आहेत.

अधिक माहितीकरिता आम्हाला संपर्क करा.

ई–विविधा साहित्य स्वीकृती अर्ज (गुगल फॉर्म) या लिंकवर क्लिक करा किंवा खालील QR कोड स्कॅन करा.

आपण लेखक किंवा कवी आहात का?

आपल्याला स्वतःचे लिखाण प्रकाशित करायचे आहे का?

आमचा संपर्क, एका क्लिकवर:

https://www.esahity.com

@evividha.magazine

Evividha Esahity Magazine

evividha.magazine@gmail.com